# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/२०२५ दि. १३ फेब्रुवारी, २०२५

जळगाव दि.१३ ( प्रतिनिधी) : जिल्हा पोलीस प्रशासनाने राष्ट्रीय महामार्गावर दुचाकी वाहनांसाठी हेल्मेट सक्ती केली असून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने विद्यापीठातील सर्व कर्मचारी/शिक्षक/विद्यार्थी आदींना हेल्मेट वापरण्यासाठी कार्यालयीन सुचना जारी केली आहे.

दि. ३ फेब्रुवारीपासून रस्ता व सुरक्षा अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने जिल्हा पोलीस प्रशासनाने राष्ट्रीय महामार्गावर हेल्मेट सक्ती केली आहे. विद्यापीठात येणारे बरेच कर्मचारी/विद्यार्थी हेल्मेटचा वापर करीत नसल्यामुळे वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी विद्यापीठाला निदर्शनास आणून दिले होते. त्या दृष्टीने कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी कार्यालयीन सूचना जारी केली आहे. दि. १४ फेब्रुवारीपासून विद्यापीठात दुचाकी वाहनधारकांसाठी हेल्मेट व चारचाकी वाहनांसाठी सिट बेल्टचा वापर बंधनकारक केला आहे. विद्यापीठाचे मुख्य प्रवेशद्वार व मुलांच्या वसतिगृहाजवळील प्रवेशद्वाराजवळ हेल्मेट व चारचाकीसाठी सिटबेल्ट लावणाऱ्यांनाच प्रवेश दिला जाणार आहे. विद्यापीठातील सर्व कर्मचारी, शिक्षक तसेच अभ्यागत यांनी या सूचनेचे पालन करावे असे आवाहन विद्यापीठ प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनंसपर्क अधिकारी